# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.07.2025** **वार:शनिवार**

1. संसदेत कालही गदारोळ, सोमवारपासून कामकाज सुरळीत चालवण्याबाबत सर्वपक्षीय बैठकीत सहमती
2. विविध विकासकामांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्र्यांनी घेतली केंद्रिय मंत्र्यांची भेट
3. अमेरिकेतल्या मराठी शाळांना महाराष्ट्र शासनातर्फे अभ्यासक्रम देण्याचं सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांचं आश्वासन
4. फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताच्या दिव्या देशमुख आणि कोनेरू हंपी यांच्यात आज अंतिम लढत आणि
5. राज्याच्या बहुतांश भागात जोरदार पाऊस; आजही कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा

**संसद**

संसदेच्या दोन्ही सभागृहात कालही विविध मुद्द्यांवरुन विरोधकांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी लोकसभेच्या कामकाजाच्या प्रारंभी कारगील विजय दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त कारगील युध्दातील हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**सर्वपक्षीय बैठक**

दरम्यान, सभागृहाचं कामकाज सुरळीत चालावं म्हणून लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी काल सर्वपक्षीय बैठक घेतली. सोमवारपासून कामकाज सुरळीत सुरू ठेवण्यावर या बैठकीत एकमत झालं. या बैठकीला भाजपा खासदारांसह काँग्रेस, समाजवादी पार्टी, संयुक्त जनता दल आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार उपस्थित होते.

**पंतप्रधान कार्यकाळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सलग सर्वाधिक काळासाठी पंतप्रधानपदी राहिलेले दुसरे पंतप्रधान ठरले आहेत. त्यांनी पंतप्रधानपदाचे 4 हजार 78 दिवस काल पूर्ण केले. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा या संदर्भातला विक्रम त्यांनी मोडला आहे. भाजपा प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी काल माध्यमांना ही माहिती दिली. पंतप्रधान मोदी यांचा कार्यकाळ विकासाचे सुवर्णयुग ठरला, असं मत त्यांनी नोंदवलं. माजी पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी सर्वाधिक म्हणजे सलग 17 वर्ष पंतप्रधान म्हणून काम केलं आहे.

**पंतप्रधान-मालदीव्ज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मालदीव्जच्या 60 व्यास्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. भारत आणि मालदीव्ज यांच्या दरम्यान विविधसामंजस्य करारही करण्यात आले आहेत.

त्यात पुण्यातल्या भारतीय उष्णकटिबंधीय हवामान विज्ञानसंस्था अर्थात आयआयटीएम बरोबर मालदीवच्या हवामानविभागाशी झालेल्या कराराचाही यात समावेश आहे.

**मुख्यमंत्री-दिल्ली भेट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या विविध विकासकामांच्या पाठपुराव्यासाठी गेले दोन दिवस अनेक केंद्रिय मंत्र्यांच्या भेटी घेतल्या. गृहमंत्री अमित शहा, आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान तसंच नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रमण्यम यांची भेट मुख्यमंत्र्यांनी घेतली.

एक हजार लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिटच्या रस्त्यांनी जोडणे, महापालिका क्षेत्रात सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, विदर्भातला खतांचा प्रकल्प, बांबू आधारित क्लस्टर, मराठवाडा वॉटर ग्रीड यासह अन्य काही विकास प्रकल्पांना केंद्राकडून मदत मिळण्याविषयी फडणवीस यांनी यावेळी चर्चा केली.

**अमेरिका मराठी शाळा**

अमेरिकेतल्या मराठी शाळांना महाराष्ट्र शासनातर्फे अभ्यासक्रम देऊ, असं आश्वासन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिलं आहे. शेलार यांनी अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्कोमधल्या बे एरिया इथं मराठी शाळा चालवणाऱ्या महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. 2005 पासून सुरू असलेल्या या शाळेत 300 विद्यार्थी मराठी शिकत आहेत.

महाराष्ट्र शासनानं अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिला तर मराठी भाषा शिकवणं, परीक्षा घेणं आणि विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देणं सुलभ होईल, असं या शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी या भेटीत सांगितलं. याबाबत मुख्यमंत्री आणि शालेय शिक्षण मंत्र्यांशी चर्चा करुन आवश्यक सहकार्य करण्याचं आश्वासन शेलार यांनी महाराष्ट्र मंडळाला दिलं.

**अजित पवार**

पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि महामार्गच्या प्रश्नासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेणार असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. नवीन प्रस्तावित रेल्वे प्रकल्पानुसार, तळेगाव-चाकण-वाघोली-उरळी आणि पुणे-सोलापूर रेल्वे मार्ग जोडला जाणार आहे. तर दुसरा रेल्वे प्रकल्प वाघोलीवरून वढू बुद्रुक, शिक्रापूर, अहिल्यानगर या मार्गे जाणार आहे. या प्रकल्पामुळे पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होईल, पहिला प्रकल्प चार वर्षांत, तर दुसरा प्रकल्प पाच वर्षांत पूर्ण करण्याचं नियोजन आहे असं पवार यांनी सांगितलं.

**हृदय विकार निदान-सोलापूर**

सोलापूरमधले प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांनी हृदय विकाराच्या झटक्याचं निदान करणाऱ्या अनोख्या उपकरणाचं संशोधन केलं आहे. त्याला नुकतंच पेटंटही मिळालं आहे. याविषयी आमच्या सोलापूरच्या प्रतिनिधीशी बोलताना ते म्हणाले...

**मी असा विचार केला की, एखादं अस जॉकेट बनवावं, ज्याच्या आत इलेक्टॉन्स असतील. जे घातकं आणि बटन दाबलं, की त्या डिव्हाईजमध्ये ईसीजी रेकॉर्ड होईल, तो मोबाईलवरनं कुठल्याही डॉक्टरांकडे ट्रान्सफर व्हावा. हार्टऍटेक मध्ये येणारा ईसीजी हा नेहमीच्याच हार्टऍटेक च्या ईसीजी सारखा असेल. ह्याच्यात बाकीच्या ईसीजी मध्ये अपडाउन असतात, त्याच्याशी संबंध नाही. फक्त हार्टऍटेक जो मेन मृत्यूस कारणीभूत आहे. त्याच्यामध्ये जो या 10 पॉईंट्स मधून येणारा ईसीजी आहे, तो नेहमीच्या ईसीजी सारखाच आहे, असं मी दाखवू शकलो. तर जे 10 पॉईंट्स मी शोधुन काठले याच्याकरीता मला चार दिवसापूर्वी हे भारतसरकार तर्फे पेटंट मिळाले आहे**

**ड्रोन औषध-नंदूरबार**

नंदूरबार जिल्ह्यातल्या दुर्गम भागात ड्रोनद्वारे औषधं पुरवण्याची पहिली यशस्वी चाचणी काल घेण्यात आली. ऐकूया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**नंदूरबार हा आदिवासीबहुल जिल्हा असून जिल्ह्यातली बरीचशी लोकवस्ती सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेल्या आदिवासी पाडे आणि वस्त्यांमध्ये आहे. या दुर्गम भागात उपलब्ध आरोग्यसुविधांची संख्याही कमी आहे. पावसाळ्यात अनेक वाड्या पाड्यांचा संपर्क तुटतो. या काळात सर्पदंश आणि अन्य आजारावर लस आणि औषधांची तातडीनं आवश्यकता असते. अशावेळी त्यांच्यापर्यंत औषधं पोहोचवण्यासाठी ड्रोनचा वापर करण्याबाबत गेले काही दिवस चर्चा सुरू होती. त्यानुसार मुंबई आयआयटी मधले प्राध्यापक धावनील शुक्ला आणि त्यांच्या संशोधक मित्रांसह आरोग्य विभागानं ही चाचणी घेतली. ड्रोनद्वारे दोन किलो पर्यंत औषधं वाहून नेण्याची ही चाचणी यशस्वी ठरली. नंदूरबारची भौगोलिक, आरोग्यविषयक स्थिती लक्षात घेता किमान पंधरा किलो पर्यंतची औषधं आणि लस वाहून नेण्याची क्षमता आवश्यक आहे. यासाठी पुन्हा एकदा चाचणी केली जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी रविंद्र सोनवणे यांनी दिली. आकाशवाणी बातम्यांसाठी नंदूरबारहून नीलेश पवार यांच्यासह सुरेखा जोशी पुणे.**

**ऑलिम्पियाड**

55 व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या 5 जणांच्या संघानं 3 सुवर्ण आणि 2 रौप्यपदकं पटकावली. पुण्याचा कनिष्क जैन, जबलपूरचा स्नेहिल झा आणि इंदोरचा रिद्धेश बेंडाळे यांनी सुवर्ण, तर सूरतचा आगम शहा आणि कोटा इथला रजित गुप्ता यांनी रौप्य पदकाची कमाई केली. पॅरिस इथं झालेल्या या स्पर्धेत भारतानं पदकतालिकेत पाचवा क्रमांक मिळवला.

**बुद्धिबळ**

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना आज दिव्या देशमुख आणि कोनेरू हंपी यांच्यात होणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत भारताचं विजेतेपद आणि उपविजेतेपदही निश्चित आहे.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत मँचेस्टर इथं सुरू असलेल्या चौथ्या सामन्यात इंग्लंडनं पहिल्या डावात 186 धावांची आघाडी घेतली आहे. कालच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा यजमान संघाच्या 7 बाद 244

धावा झाल्या होत्या. तत्पूर्वी भारतानं पहिल्या डावात 358 धावा केल्या होत्या. या मालिकेत इंग्लंड 2-1 ने आघाडीवर आहे.

**पाऊस**

राज्यात काल मुंबईसह, कोकण आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये पावसानं जोरदार हजेरी लावली. मुंबईतल्या काही भागात पाणी साचल्यानं अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली. पावसामुळे रेल्वेसेवेवरही परिणाम झाला. रत्नागिरी जिल्ह्यात खेड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे जगबुडी नदी इशारा पातळीवरून वाहत आहे. पुण्यातही काल पावसानं हजेरी लावली.

रायगड जिल्ह्याला काल जोरदार पावसाने झोडपून काढलं. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. जिल्ह्यातील बहुतेक नद्या दुथडी भरून वाहत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून राधानगरी धरणाचे दोन स्वयंचलित दरवाजे उघडले आहेत, त्यामुळे जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यात कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे.

गडचिरोली जिल्ह्यातल्या नऊ विभागात मुसळधार पाऊस पडला. पर्लकोटा नदीला पूर आला असून भामरागड तालुक्यातल्या 50 हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. तर आलापल्ली-भामरागड मार्ग बंद झाला आहे. भंडारा जिल्ह्यातही जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यातल्या गोसेखुर्द धरणातून 3 हजार 24 क्यूसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे. अतीवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यात आज शाळा, महाविद्यालयांना सुटी देण्यात आली आहे.

**हवामान इशारा**

रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या घाट परिसरातही जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत उद्यापर्यंत समुद्र खवळलेला असेल आणि उंच लाटा उसळतील असा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांनी समुद्रात जाऊ नये अशी सूचना प्रशासनानं केली आहे. स्थानिक प्रशासनालाही सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.